**ठळक बातम्या**

- युद्धाच्या काळात देशातल्या नागरिकांनी एकजूट कायम ठेवावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिकेकडून ५ दिवसांची मुदतवाढ, तोपर्यंत इराणच्या वीजनिर्मिती प्रकल्पांवरचे हल्ले थांबवणार

- भोंदूबाबा अशोक खरातशी संबंध असलेल्या सर्वांवर कारवाई करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- उत्तर प्रदेशात, प्रयागराज इथं शीतगृहाचं छत कोसळल्यानं चार जणांचा मृत्यू, १२ जण जखमी

**आणि**

- ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पवनार इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

आखाती देशांमध्ये युद्ध सुरू असताना देशातल्या नागरिकांनी एकजूट रहावं आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. या मुद्द्यावर त्यांनी आज लोकसभेत निवेदन केलं. देशातला पेट्रोल, डिझेल आणि गॅस पुरवठा प्रभावित होऊ नये यासाठी सरकार शक्य तिथून इंधनाची खरेदी करत आहे. तेल, गॅस, खतांसाठी आवश्यक सामान घेऊन येणारी जहाजं देशात सुरक्षित यावीत यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. या युद्धामुळं भारतासह जगातल्या सर्व देशांसमोर संकट उभं राहिल्याचं त्यांनी सांगितलं…

**- - - होल्ड - प्रधानमंत्री बाइट - - -**

युद्धाचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार कटीबद्ध आहे. यासाठी शेतकऱ्यांना शक्य ती सर्व मदत करत राहू असं ते म्हणाले. लोकांना युद्धाची कमीत कमी झळ बसावी यासाठी सरकारनं गेल्या काही वर्षात केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्याचवेळी काळाबाजार, साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं आवाहन त्यांनी यावेळी सर्व राज्य सरकारांना केलं. युद्ध सुरु झाल्यापासून प्रभावित देशांमधले पावणे ४ लाख भारतीय

मादयदेशी परतले आहेत. इराणमधून १ हजार लोक परतल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. चर्चा आणि शांततेच्या मार्गाने युद्धावर तोडगा काढला जावा, या भारताच्या भूमिकेचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

**<><><><><>**

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेल्या मुदतीत आणखी पाच दिवसांची वाढ करत असल्याचं आज अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावर जाहीर केलं. त्यामुळे अमेरिका पुढच्या पाच दिवसांसाठी इराणच्या वीजनिर्मिती प्रकल्पांवरचे हल्ले थांबवणार आहे. अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांमध्ये अलिकडेच झालेली चर्चा यशस्वी झाली असून त्यातून तोडगा निघू शकेल अशी आशा ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. संघर्षावर तोडगा काढण्याच्या उद्देशाने दोन्ही बाजूंकडून प्रयत्न होत असल्यामुळे या वाटाघाटी आठवडाभर सुरू राहतील, असंही ट्रम्प यांनी आपल्या समाज माध्यमावर म्हटलं.

**<><><><><>**

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात ज्यांचा दुरान्वयेही संबंध असेल त्यांना सोडणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. खरातनं तथाकथित शक्तींचा दुरुपयोग करत अनेक महिलांसोबत दुष्कृत्य केलं, पण अनेक महिला घाबरून समोर यायला तयार नव्हत्या. आता काही महिलांनी तक्रार केली आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर असून पोलीस याप्रकरणी कारवाई करत आहेत. हा राजकारणाचा मुद्दा नसून महिलांच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे, त्यामुळे यावर उद्या आपण सभागृहात सविस्तर निवेदन देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

त्याआधी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. या भोंदूबाबाशी अनेक अधिकारी आणि मंत्र्यांचेही संबंध होते. या सर्वांचे राजीनामे घेऊन त्यांना सहआरोपी करा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. यामुळे महाराष्ट्राची बदनामी झाली आहे, असं ते म्हणाले. नाना पटोले आणि भास्कर जाधव यांनीही याचा पुनरुच्चार केला. या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा घडवून आणावी, अशी मागणी त्यांनी केली. मात्र ही मागणी अध्यक्षांनी फेटाळून लावली. यानंतर शिवसेनेच्या आमदारांनी हौद्यात उतरून गदारोळ केला. या गदारोळातच महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन कायदे सुधारणा विधेयक मांडण्यात आलं.

<><><><><>

विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज सकाळी सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल्या पोलिसांच्या भूमिकेचा मुद्दा चर्चेला आला. याप्रकरणी चौकशी करुन योग्य कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत दिलं. तर विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी याप्रकरणी पोलीस अधीक्षकांच्या निलंबनाचे निर्देश दिले. मात्र, मंत्री जयकुमार गोरे यांनी याला हरकत घेत, पूर्वचौकशी न करता अशाप्रकारे निलंबनाचे निर्देश देणं योग्य नसल्याचं मत नोंदवलं. त्यावर सभापती राम शिंदे यांनी उपसभापतींनी दिलेल्या निर्देशांवर आपला निर्णय तयार असून तो सध्या राखून ठेवत असल्याचं जाहीर केलं.

राज्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. याचा अहवाल आल्यानंतर शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, असं कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितलं. हेमंत ओगले यांनी हा मुद्दा उपस्थित केला.

<><><><><>

वन्यजीव संरक्षण महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६ विधानपरिषदेनं एकमतानं मंजूर केलं. मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी राज्य सरकारच्या परवानगीने बिबट्यांचं स्थानांतरण करणं, संख्येचं व्यवस्थापन करणं यासाठी वन्यजीव रक्षकाला आवश्यक पावलं उचलण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या दुसरी सुधारणा विधेयक, २०२६, तसंच महाराष्ट्र निरसन विधेयकही, आज विधान परिषदेत मंजूर झालं. ही तिन्ही विधेयकं विधानसभेनं याआधीच मंजूर केली आहेत.

<><><><><>

उत्तर प्रदेशात, प्रयागराज इथं आज एका शीतगृहाचं छत कोसळल्यानं चार जणांचा मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले. ढिगाऱ्याखालून १७ मजुरांना वाचवलं असून, इतर अनेक जण अडकल्याची भीती आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं बचाव आणि मदतकार्य करत आहेत. ढिगारा हटवण्यासाठी ७ जेसीबी घटनास्थळी तैनात आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून,. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><>

ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर आज पवनार इथल्या त्यांच्या शेतात शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार झाले. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. तत्पूर्वी मेघे यांच्या नागपुरातल्या निवासस्थानी आणि नंतर सावंगी मेघे इथं त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं.

मेघे यांचं काल वयाच्या ८९व्या वर्षी निधन झालं. त्यांनी राज्यात चार वेळा मंत्रीपद भूषवलं तसंच विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते म्हणून काम पाहिलं. १९९१ मध्ये ते नागपूर लोकसभा मतदारसंघातून खासदार झाले, आणि त्यानंतर रामटेक आणि वर्धा इथूनही निवडून आले. ते राज्यसभेचे सदस्यही होते.

<><><><>

लोकसभेत आज २०२६ चं वित्त विधेयक चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी घेण्यात आलं. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक प्रस्तावांची अंमलबजावणी करणारं हे विधेयक आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक मांडलं. चर्चेच्या सुरुवातीला काँग्रेसच्या डॉ. अमर सिंग यांनी देशातल्या बेरोजगारीचा प्रश्न उपस्थित केला. सरकारकडून दिलेली करसवलत ही काही निवडक कंपन्यांनाच फायदेशीर ठरत असल्याचा आरोप त्यांनी केला. चलनफुगवटा हे देशासमोरच सर्वात मोठं आव्हान असल्याचं ते म्हणाले.

<><><><>

राज्यसभेत विनियोजन विधेयक २०२६ वर चर्चा झाली. हे विधेयक आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या सेवांसाठी भारताच्या एकत्रित निधीतून ठरावीक रक्कम काढण्याबाबत आणि ती खर्च करण्याबाबत सरकारला अधिकार देतं. लोकसभेनं गेल्या आठवड्यात हे विधेयक मंजूर केलं असून, राज्यसभेतल्या चर्चेनंतर ते पुन्हा लोकसभेकडे पाठवलं जाईल.

<><><><>

थोर क्रांतिकारक हुतात्मा भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या बलिदानदिनानिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. शहीद दिनानिमित्त केंद्रीय

युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या नेतृत्वाखाली आज फरिदाबाद इथं माझा भारत माझी जबाबदारी उपक्रमांतर्गत पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं. तरुणांमध्ये देशभक्ती, एकता आणि नागरिक म्हणून कर्तव्याप्रति जबाबदारीची जाणीव करून देणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या पदयात्रेत दहा हजारांपेक्षा जास्त तरुण सहभागी झाले होते.

महाराष्ट्रात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आपल्या निवासस्थानी या तीन शहीदांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

**<><><><><>**

एपस्टिन फाईल प्रकरणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघानं स्पष्ट भूमिका घ्यावी, या मागणीसाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली आज नागपुरात संयुक्त मोर्चा निघाला. मोर्चामध्ये विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चा रिझर्व्ह बँक चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालय, महाल परिसरापर्यंत काढण्याची योजना होती. मात्र पोलिसांनी परवानगी नाकारल्यामुळे नेत्यांच्या भाषणानंतर झिरो माईल्स परिसरात मोर्चाचा समारोप करण्यात आला.

**<><><><><>**

कोकणात तुरळक ठिकाणी उद्यापर्यंत उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. पालघर आणि रत्नागिरी जिल्ह्यांमधे आज तापमानात मोठी वाढ होईल. मुंबईसह ठाणे, रायगड, आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात उष्मा वाढेल.

पश्चिम महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी येत्या तीन दिवसात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

**//<><><><><>//**